महावितरण

# जाहीर सुचना

वर्ष २०२२-२०२३ करीता आय.टी.आय. विजतंत्री (Electrician) ट्रेड ६५ पदे, तारतंत्री (Wireman) ट्रेड ६५ पदे व संगणक चालक (COPA) ट्रेड २० पदे NCVT उत्तीर्ण झालेल्या (१०+२ या आकृतीबंधामधील) उमेदवारांकडून शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थी (Apprentice-ship) एकूण १५० पदाकरिता अर्ज मागवण्यात येत आहेत.

Apprentice Portal वरील म.रा.वि.वि.कं.मर्या.मंडळ उस्मानाबाद E05202702563 या आस्थापनेवर ऑनलाइन अर्ज भरून दि. १५.११.२०२२ ते १७.११.२०२२ या कालावधीमध्ये सकाळी ११.०० ते दु.४.०० या वेळेत सर्व शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह (इयत्ता १० वी चे गुणपत्रक व सनद, आयटीआय गुणपत्रक व सनद, जात प्रमाणपत्र, आधारकार्ड, Apprentice Registration प्रत व पासपोर्ट साईज फोटो सह) प्रत्यक्ष मंडळ कार्यालय येथे वरील तारखेस सादर करावेत.

२) उमेदवाराचे Aprentice Portal वर ऑनलाईन रजिस्ट्रेशन असणे अनिवार्य आहे.

३) उमेदवाराची निवड आय.टी.आय.च्या ०४ सत्राच्या (Semester) मिळालेल्या एकूण गुणाच्या सरासरीनुसार, तसेच महाराष्ट्र शासन नियमाप्रमाणे असलेल्या आरक्षणानुसार निवड करण्यात येईल.

४) उमेदवाराने लोकप्रतिनिधी अथवा राजकीय व्यक्तीकडून दबाव आणल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारास राहतील.

५) निवड झालेल्या पात्र उमेदवारांची प्राथमिक पडताळणी यादी दि.२९.११.२०२२ रोजी मंडळ कार्यालय उस्मानाबाद येथील नोटीस बोर्डवर प्रकाशित करण्यात येईल. व निवड झालेल्या उमेदवारांना मूळ कागदपत्र छाननी करिता येण्याची पुढची तारीख कळविण्यात येईल. सदर दिवशी निवड झालेला उमेदवार हजर न राहिल्यास अशा उमेदवाराचा प्रशिक्षणार्थी भरती करिता विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

६) सदर प्रक्रिया हि उस्मानाबाद जिल्ह्यातीलच उमेदवारांसाठी मर्यादित आहे याची नोंद घ्यावी.

७) भरती प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास कोणताही बदल करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकारास राहील.

अधिक्षक अभियंता
मंडळ कार्यालय, उस्मानाबाद.

PRO No.131/2022-23